# १८५७ चा उठाव



"परकीयांनी लिहिलेला आपला इतिहास आम्ही जसाच्या तसा स्वीकारणे हे लज्जास्पद आहे," अशा अर्थाचं लो. टिळकांचं एक वाक्य आहे. परंतु, इतकी वर्षं लोटल्यानंतरही आमचा खाक्या हाच चालू आहे. १८५७च्या स्वातंत्र्यसमराचीच गोष्ट घ्या. त्याला काही इंग्रजांनी 'शिपायांचं बंड' म्हटलं. झालं! ते आम्ही प्रमाण मानून मोकळे झालो. सावरकरांनी ते बंड नसून स्वातंत्र्यसमर होतं, याची इंग्रजांचीच कागदपत्रं तपासून साधार सणसणीत मांडणी त्यांच्या त्या प्रभावी ग्रंथात केली. परंतु, तो पडला बाजूला! इंग्रजांनी तो राजहत ( जप्त ) करावा हे साहजिकच; परंतु आम्ही? ही 'एस' जीवनसत्त्वाची कमतरता स्वाभिमानाची!

सावरकरांनी त्या महासंग्रामाचा ऊहापोह त्यांच्या अतिशय रसरशीत शैलीत केला आहे. ते सांगतात की, " १८५७च्या क्रांतीची प्रधान कारणं ही दिव्य तत्त्वं होती. 'स्वधर्म' आणि 'स्वराज्य' ही 'स्वधर्मप्रीती' आणि 'स्वराज्यप्रीती' ही उदात्त तत्त्वे हिंदुस्थानच्या इतिहासात जितक्या स्पष्टतेने, जितक्या उदात्ततेने दिसतात, तितकी आणखी कुठे दिसतात? जगात 'धर्मयुद्ध' अनेक झाली. परंतु, त्यात क्रौर्य भरलेलं आहे. वास्तविक, ती , धर्माधर्मांत झालेली युद्धे आहेत. ती दोन तत्त्वं बहादूरशहाच्या जाहीरनाम्यात आणि राणी लक्ष्मीच्या पत्रात तितक्याच स्पष्टतेनं दिसावीत हे महत्त्वाचं आहे. येथील जनतेवर ब्रिटिशांनी लादलेला भयंकर अन्याय, इथल्या अर्थव्यवस्था, समाजव्यवस्था, न्यायव्यवस्था धर्मनीती, राष्ट्रीयता या सर्वांवर ब्रिटिशांनी आणलेलं भयानक प्राणसंकट हेच या क्रांतीच्या मुळाशी होतं."

'कंपनी सरकार'च्या क्रौर्याविरोधाची भावना इतकी सार्वत्रिक होती की, त्या धगीमध्ये इथले धार्मिक, जातीय, सारेच भेद विरघळले आणि एकतेची भावना उजळून निघाली. हे या समराचं अतिशय महत्त्वाचं वैशिष्ट्य आहे. 'काडतुसां'चंच एक कारण दिलं जातं. परंतु, खरी कारणं पाहा- १. संस्थानिकांवरचा अमानुष अन्याय, त्यांचा विश्वासघात. २. अन्याय्य रीतीनं वाढविलेला शेतसारा, जमिनी ताब्यात घेणे. ३. या देशाची भूमी लुटली तशीच संपत्तीही लुटली.

४. या देशातली मुळातली न्यायव्यवस्था ही सोपी, वेगवान, बिनखर्चाची, विश्वासाची होती ती नष्ट केली. लोकांतला परस्पर विश्वास, सत्यतेला धरून वागण्याची सवय यावर घाला घातला. नवा कायदा, न्यायालये, 'स्टॅम्प ड्युटी', वकील, परकीय भाषा, परके वातावरण, या वेळखाऊ, खर्चिक, खोट्या साक्षींना उत्तेजन देणाऱ्या गोष्टी आल्या. ५. या देशातल्या सुंदर स्त्रियांना आपल्या जनानखान्यात ओढणे, नीचपणा १७५७च्या वेलस्लीच्या काळापासूनच चालू होता. ६. काडतुसांचा (गाई आणि डुकराची चरबी लावलेली) उपयोग १८५३ पासूनच चालू केला होता. ७. मिशनऱ्यांच्या बाटवाबाटवीमुळे लोक कुरद्ध होतेच.

क्रांतितत्त्वांचा प्रसार मौलवी, संन्यासी, ब्राह्मण, वैदू, तमासगीर, शाहीर असे सर्व प्रकारचे लोक समाजात गुप्तपणे वावरून त्या क्रोधभावनेला धार लावत होते. उत्सव, सण, जत्रा, यात्रा अशा ठिकाणी हे आणखी सुलभच व्हायचे. मंदिरं, मशिदी, घरं, शेतं, सारीच ठिकाणं ही ठिणगी फुलवू लागली. श्रीमंत नानासाहेब पेशवे यांनी प्रथमत: संस्थानिकांना पत्रं पाठविणं चालू केलं. 'कमलपुष्पे' आणि 'भाकरी' या दोन चिन्हाद्वारे शत्रूविरोधात उठाव करण्यासाठी वचनबद्ध होण्याची नि करण्याची कल्पना ज्या प्रतिभावंतांच्या मेंदूतून निघाली असेल, त्याला सावरकरांनी नित्याचा नमस्कार करून ठेवला आहे.

क्रांतियुद्धाची काही वैशिष्ट्ये * जनतेतील एकी ही सर्व स्तरांवरच्या भिंती पाडणारी अभूतपूर्व अशी होती. * युद्धाच्या तयारीची गुप्तता ही इतकी विलक्षण होती की, सर्व काही ठीक आहे, असं समजणारे ब्रिटिश अधिकारी चकित होऊन गेले. * अत्युच्च त्यागभावना, स्वदेशप्रीती, दास्याचा तिटकारा आणि परकीय छळकारांविरुद्ध संतापाची भावना यांचा प्रभाव सर्वत्र होता. बहादूरशहाचे यावेळचे जाहीरनामे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. एकात त्यानं म्हटलं आहे, "जर सर्व संस्थानिक मिळून देश ब्रिटिशांपासून मुक्त करतील, तर त्यांची तशी मागणी असल्यास त्याचा एक संघ निर्मून त्याच्याद्वारे देशाचा राज्यकारभार करण्यात येईल.”


स्त्रियांची कामगिरी स्वातंत्र्यसमरात नागरिक आणि सैनिकांना स्फूर्ती देणाऱ्या चेतविणाऱ्या लढविणाऱ्या स्त्रिया या सर्व स्तरातल्या होत्या. घरगुती औषधं देणाऱ्या, किरकोळ भविष्यकथन करणाऱ्या वैदू बाया किंवा कानपुरातल्या अझीझन या कलावंतिणीसारख्या देशाभिमानी स्त्रिया, तर कधी अयोध्येच्या बेगमेसारखी संस्थानिक स्त्री ! तमासगीर बंधू, शाहीर यांची कवनं आणि वग स्फूर्तिदायक कथानकांचे. तारेच्या बाहुल्यांचे खेळ करणारे, मौलवी, फकीर, संन्यासी आणि ब्राह्मण, सर्व प्रकरचे स्त्री-पुरुष एका ध्येयानं पछाडून या लढ्यात सामील झाले.

तात्या टोपे तात्या टोपे यांच्या बहादुरीचं वर्णन त्यांच्या शत्रूंनी करून ठेवलं आहे. त्यांचं आणि "त्यांच्याबरोबर क्षणात इकडे तर क्षणात तिकडे होणाऱ्या, क्षणात अदृश्य, तर क्षणात दृश्य होणाऱ्या त्यांच्या सेनेचं!" अशा या शूर देशभक्ताला, ग्वाल्हेरला मानसिंह नावाच्या सरदाराकडे गेले असता, जहागिरीसाठी फितूर होऊन त्यानं इंग्रजांच्या हवाली केलं. दुर्दैव! देशाचं दुदैव! एका ब्रिटिश सेनापतीनं लिहून ठेवलं आहे, “असे अर्धा डझन तात्या टोपे जर भारताकडे असते, तर आम्हाला तेव्हाच भारत सोडावा लागला असता! मिरतची उठावणी ही ब्रिटिशांच्या सैन्याला भयभीत करून, स्तब्ध करून ठेवणारी यशस्वी उठावणी होती." दिल्ली, बरेली, कानपूर, झाशी, अयोध्या या सर्व ठिकाणी प्रारंभी 'बंड'वाल्या देशभक्त सेनेचीच सरशी झालेली होती.

**तात्या टोपेंचे सैन्य**



- पराजयाची कारणे शीख पलटणी (शीख संस्थाने) यापैकी काही संस्थाने इंग्रजांच्या बाजूने लढली. ब्रिटिशांच्या फौजेत भारतीय शिपाई होतेच ना. पण, त्यांना आपलं कोण, परकीय आणि अत्याचारी कोण, हे कळलं नाही. ब्रिटिश फौजेतल्या नेटिव्ह शिपायांनी जे शौर्य अत्यंत प्रकर्षाने दाखविले, त्याला पाहून रणांगणातील भूत-पिशाचे हसली असतील- इतका बीभत्सरस कुणीही पिकवला नसेल! गुरख्यांना सर्व समजावून देऊनही त्यांनी स्वदेशाच्या वतीनं लढण्याचं नाकारलं. नेपाळने शक्ती पुरवण्याचं नाकारलं.



१८५७ च्या उठावातील दोन व्यक्तींना फाशी